**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/14-15/ DATE : 05-Jun-15 6:47:13 PM

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था,

विषय :- **जाहीर झालेल्या निकालातील त्रुटी किंवा ऑड नंबरच्या निकालाबाबत...**

महोदय/महोदया,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, बी.ए. आणि बी.कॉम. च्या अंतीम वर्षाचा निकाल जाहीर झालेला असून संकेत स्थळावर यादी विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी ठेवण्यात आली आहे. जसजसे निकाल जाहीर होतील तसतसे अन्य परीक्षांचे निकालही संकेत स्थळावर पाठविण्यात येतील. ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज http://suk.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावरून महाविद्यालयांनी किंवा स्वत: विद्यार्थ्यांनी भरलेले आहेत त्यांचा पूर्णत: निकाल जाहीर झालेला आहे. तथापि ज्या विद्यार्थ्यांनी मॅन्युअली परीक्षा अर्ज भरलेले होते आणि महाविद्यालयांनी त्यांना वरील प्रणालीत समाविष्ट केलेले नव्हते अशा विद्यार्थ्यांना आयत्या वेळी **ऑड नंबर द्यावे लागले होते**. अशा विद्यार्थ्यांपैकी बहुतांश विद्यार्थ्यांना प्रणालीत घेण्यात आले, त्यांचा निकालही जाहीर झाला. तथापि कांही मोजके विद्यार्थी तांत्रिक कारणास्तव प्रणालीत समाविष्ट झालेले नाहीत त्यामुळे त्यांचा निकाल तयार करण्यात अडचणी आल्या आहेत. तसेच कॉंबिनेशनच्या विद्यार्थ्यांचे निकाल तयार करण्याचे काम सुरू आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे निकाल १५ जून २०१५ पर्यंत किंवा तत्पूर्वी संकेतस्थळावर त्या त्या वेळी उपलब्ध करण्यात येतील.

जे विद्यार्थी ऑक्टोबर-२०१४ पूर्वीचे आहेत परंतु ते गॅप घेऊन मार्च-२०१५ च्या परीक्षेस प्रविष्ट झालेले आहेत व ज्यांचा निकाल जाहीर झालेला नाही अशा विद्यार्थ्यांनी त्यांची यापूर्वीची माहिति सोबतच्या **प्रपत्र-१** मध्ये भरून पूर्वीच्या संबंधित निकालाच्या झेरॉक्स प्रतींसह तात्काळ प्राचार्यांमार्फत संबंधित परीक्षा विभागाकडे पाठवावी. निकाल जाहीर झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांच्या निकालात त्रुटी आढळून येतील त्यांनीही याच प्रपत्र-१ मध्ये माहिती भरून पाठविण्याची आहे. **अशा प्रकारचे अर्ज संबंधित परीक्षा विभागात पाठविण्याचे आहेत. थेट डियुडिसी विभागात कोणताही पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही अथवा संबंधित परीक्षा विभागातील अधिका-यांच्या मान्यतेशिवाय कोणत्याही प्रकारच्या दुरूस्त्या केल्या जाणार नाहीत. विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागात स्वत: येऊ नये.**

**निकालात त्रुटी आढळण्याचे खालील प्रकार संभवतात.**

१. विद्यार्थ्याच्या नोंदणीच्या वेळी घेतलेले विषय नंतर बदलले जातात. मात्र महाविद्यालयांकडून अशा विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमध्ये त्याचे नंतर बदलले विषय बदल त्या त्या वेळी केले जात नाहीत.
२. परीक्षा अर्ज इनवर्ड करण्यापूर्वी त्या त्या विद्यार्थ्यांचे विषय न तपासता अर्ज इनवर्ड केले जातात. त्यामुळे हॉल तिकीटवर विषय आधीचे म्हणजेच नोंदणीवेळीचे येतात.
३. असे विद्यार्थी बदललेल्या विषयांना परीक्षेस बसतात, मात्र हॉल तिकीटवर आलेल्या आधीच्या विषयांच्या जागी ते ॲब्सेंट दिसू लागतात.
४. मुदतीनंतर मॅन्युअल फॉर्म भरले जातात परंतु ते महाविद्यालयांच्या लॉगीनमध्ये घेऊन प्रणालीत समाविष्ट केले गेलेले नसतात.
५. या विद्यार्थ्यांना ऑड नंबर आयत्या वेळी घेतले जातात. ऑड नंबरच्या विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती परीक्षा विभागाकडे पाठविली जात नाही. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचा निकाल तयार करताना अनेक अडचणी येतात.

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/14-15/ DATE : 05-Jun-15 6:47:13 PM



६. कांही विद्यार्थ्यांचा प्रणालीत समावेश असतो, त्यांना प्रणालीद्वारे बैठक क्रमांकही जनरेट झालेला असतो परंतु विद्यार्थी प्रणालीत नंबर न पाहता ऑड नंबरची मागणी करतो. महाविद्यालयांकडूनही अशा विद्यार्थ्यांची खात्री न करता ऑड नंबर मागवून दिले जातात. त्यामुळे विद्यार्थी ऑड नंबरने परीक्षेस बसतो. मात्र प्रणालीद्वारे जनरेट झालेल्या बैठक क्रमांकास ॲब्सेंट दिसतो.

७. महाविद्यालयांकडून कांही वेळा पीआरएनवरून प्रात्यक्षिक परीक्षा दिलेली असते. मात्र गुण पाठविताना त्यांच्या नांवापुढे परीक्षा बैठक क्रमांक दर्शविण्यात येत नाहीत त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे गुण प्रणालीत घेणे अडचणीचे होते.

८. वार्षिक पध्दतीचे विद्यार्थी तसेच ४०:१० पध्दतीचे विद्यार्थी अशा जुन्या विद्यार्थ्यांची गुणाची अपडेट माहिती पोर्टलवर उपलब्ध नसण्यामुळे अंतीम निकाल तयार होताना अडचण येते. अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये स्टुडंट प्रोफाईल पाहून विद्यार्थ्याच्या एक्झाम डिटेल्समध्ये त्याचे पूर्वीचे निकालाचे स्टेटस् काय दिसत आहे याची त्याबाबतची पूर्तता म्हणजेच उत्तीर्ण झालेल्या परीक्षांची पूर्वीची मार्कलिस्ट आणि प्रपत्र-१ मधील अर्ज सादर करण्याबाबत मार्गदर्शन करावे.

९. विद्यार्थी स्वत:चे प्रोफाईल खालील पध्दतीने पोर्टलवर पाहू शकतात.
http://suk.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर पीआरएन भरून खालीलप्रमाणे लॉगीन करता येईल.

User: PRN
Password: ********
Go
**Forgot Password**

पासवर्ड माहिती नसेल तर **Forgot Password** या लिंकवर क्लिक करावे.
त्यानंतर खालीलप्रमाणे विंडो दिसेल त्यामध्ये माहिती भरावी

**PRN / Login ID:** * PRN should be 16-digit.'
**Date of Birth** * [dd/mm/yyyy]
**Mother's First Name:** *

वरील माहिती भरून **Recover password** या लिंकवर क्लिक करावे. यानंतर पासवर्ड दिसेल, त्या पासवर्डने विद्यार्थी स्वत:चे लॉगीन करू शकतात व आवश्यक सर्व प्रकारची माहिती खालील लिंकंनुसार अपडेट करू शकतात.

**Shivaji University**
Vidyanagar, Kolhapur-416004, Maharashtra(India)

My Profile Academics Examinations ApplicationsPhoto Gallery

Revaluation
Verification
Photocopy of Answerbook
Duplicate Statement of Marks
Exemption Cancellation
Ordinance Cancellation
Paper Change
Migration
Convocation

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/14-15/ DATE : 05-Jun-15 6:47:13 PM



My Profile मधून नांवातील दुरूस्ती, पत्त्यातील दुरूस्ती, आईच्या नांवातील दुरूस्ती इत्यादी दुरूस्त्या त्यांच्या पातळीवर करण्याबाबत प्रणालीत नोंदी करू शकतात. तसेच आवश्यक ते अर्ज उदा. फोटो कॉपी, व्हेरिफिकेशन इत्यादी अर्ज प्रणालीतून भरू शकतात. ज्यामुळे विद्यार्थ्यांना नेट कॅफेवर अवलंबून राहावे लागणार नाही. तसेच विद्यापीठातही यावे लागणार नाही.

तरी वरील प्रमाणे माहिती सर्व संबंधित घटकाना/विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी व त्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. महाविद्यालयांतील कोणत्याही घटकांनी विद्यार्थ्यांना अस्वस्थ करून विद्यापीठात जाण्यास उद्युक्त करू नये.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
(महेश काकडे),
परीक्षा नियंत्रक

**प्रत :-**

**सर्व परीक्षा विभागप्रमुखांस माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

सर्व संबंधित परीक्षा विभागप्रमुख, संबंधित सहा. कुलसचिव आणि उपकुलसचिव यांना अवगत करण्यात येते की, निकाल दुरूस्त्या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार विद्यार्थी अथवा महाविद्यालये यांच्याकडून थेट डियुडिसी विभागात स्विकारला जाणार नाही. वर उल्लेख केलेल्या प्रपत्रातच ज्या दुरूस्त्या करावयाच्या आहेत त्याबददल स्वयंस्पष्ट सूचना आणि संबंधित लिपिक व विभागप्रमुखाची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना अथवा महाविद्यालयातील कर्मचा-यांना थेट डियुडिसी विभागात पाठवू नये. त्यांनी सादर केलेले अर्ज, माहिती प्रथम विभागात सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्विकारावी त्यांचे वर्गीकरण करून संबंधित लिपिकाने त्या त्या कागदपत्रासह सायंकाळी ४.०० नंतर डियुडिसी विभागात स्वत: जावे व दुरूस्त्या करवून त्याची चेकलिस्ट काढून घ्यावी. चेकलिस्टवर योग्य दुरूस्त्या झाल्याची खातरजमा करावी व त्यानंतर सुधारित मार्कलिस्ट काढण्याबाबत संमती द्यावी, काढलेली मार्कलिस्ट संबंधित परीक्षा विभागास दुस-या दिवशी पाठविण्यात येतील. विद्यार्थ्यांना/महाविद्यालयांना ती पाठविण्याची व्यवस्था संबंधित परीक्षा विभागातूनच करावयाची आहे. विद्यार्थी, पालक अथवा महाविद्यालयीन कर्मचारी यांना थेट डियुडिसी विभागातून कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दिले जाणार नाहीत याबाबतची काटेकोर दक्षता डियुडिसी विभागानेही घ्यावयाची आहे.